महाराष्ट्र आदिवासी विकास सेवा गट- अ
मधील सह आयुक्त या पदावरील तदर्थ
पदोन्नतीबाबत..

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः बढती-१७१७/प्र.क्र.१५ /का.१५

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
तारीखः ११ सप्टेंबर, २०१७.

वाचा :-

१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/ का.१२, दि.२८/०४/२०१५.

२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/ का.१२, दि.१५/०६/२०१७.

शासन आदेश :-

महाराष्ट्र आदिवासी विकास सेवेतील उपायुक्त /उपसंचालक /प्रकल्प अधिकारी (श्रेणी-१) (वेतन संरचना रुपये १५६००-३९१००+ ग्रेड पे रु.६६००) संवर्गामधील अधिकाऱ्यांना सहआयुक्त संवर्गात (वेतन संरचना रुपये १५६००-३९१००+ ग्रेड पे रु. ७६००) या आदेशान्वये पदोन्नतीच्या कोट्यातील पदावर त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी तदर्थ स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण	शेरा
१	२	३	४
१	श्री.एस.टी.भालेकर	सहआयुक्त, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे.	रिक्त पदावर
२	श्री.एस.डी. गोलाईत	सहआयुक्त,अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक.	श्री. जगताप यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर
३	श्रीमती बी.जी.गिरी	सहआयुक्त,अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार	रिक्त पदावर
४	श्रा.एस.पी.वानखेडे	सहआयुक्त, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली.	रिक्त पदावर

३.	वरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती ही खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१)	पदोन्नतीच्या कोट्यातील पदावर देण्यात येत असलेली सदर पदोन्नती तदर्थ स्वरुपाची असून, ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२)	सदर पदोन्नत्या तदर्थ व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्रमांक २७९७/ २०१५ (महाराष्ट्र राज्य विरुध्द श्री. विजय घोगरे व इतर) तसेच संलग्न इतर न्यायालयीन प्रकरणामध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

३)	सदर तदर्थ पदोन्नत्या ह्या आस्थापना मंडळाच्या शिफारशींनुसार अधिक्रमित होणाऱ्या मागासवर्ग अधिकाऱ्याच्या अधिक्रमणाला मा.मंत्री (सामाजिक न्याय) व अनुसूचित जमातीच्या अधिकाऱ्यांच्या अधिक्रमणाला मा.मंत्री (आदिवासी विकास) यांची मान्यता घेण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहे

४.	तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून सात दिवसाच्या आत हजर होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांनी पदोन्नती नाकारली आहे असे समजून, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२,दि.१२/०९/२०१६ मधील तरतुदींनुसार त्यांच्या पदोन्नतीने केलेल्या नियुक्त्या रद्द करण्यात येतील.

५.	तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना नविन पदावर रुजू होण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

६.	तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती दिलेल्या पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. त्यांनी अनधिकृतरित्या रजेवर जाऊ नये. यासंदर्भात त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. सीडीआर-१०८२/२५६७/२८/११, दि.३०/०८/१९८२ अन्वये दिलेल्या सूचनांकडे वेधण्यात येत आहे. तसेच नियुक्ती रद्द करणेसाठी कुठल्याही स्वरुपाचे आवेदन करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाई पात्र ठरतील यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१११२४१५९७६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Govind Mahadeo Mainkar
Date: 2017.09.11 12:32:04 +05'30'

(गोविंद माईणकर)
अवर सचिव

प्रत,

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
७. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
८. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक/ अमरावती / नागपूर
९. सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
११. सर्व अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
१२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१४. संबंधित अधिकारी,
१५. निवड नस्ती (का.१५)